Dr. Babasaheb Ambedkar
Marathwada University
Chhatrapati Sambhajinagar-431004
Maharashtra (India)
NAAC Re-accredited A Grade
Telephone
Office PBX : (0240) 2403399/400
Director : (0240) 2403201
Office : (0240) 2403178 / 199
Website : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac.
E-Mail : coe@bamu.ac.in

डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ
छत्रपती संभाजीनगर-४३१००४. महाराष्ट्र (भारत)
नॅक समितीतर्फे 'अ' दर्जा प्राप्त

Office : Director, Board of Examination & Evaluation
कार्यालय : संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ

संदर्भ क्र. परीक्षा/२०२४/1551

दिनांक : १४.११.२०२४ 18

# परिपत्रक

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, पदवी आवेदनपत्र सादर करण्यासंबंधी यापूर्वी विविध सूचना पदवी विभागामार्फत निर्गमित करण्यात आलेल्या आहेत, तथापि, पदवी प्रमाणपत्रासाठी स्नातकांना अडचणी निर्माण होऊ नयेत यासाठी खालील सूचनांचे पालन करण्यासंबंधी परिपत्रकाद्वारे आवाहन करण्यात येत आहे :

१. शैक्षणिक वर्ष २०१७ नंतर पदवी प्रमाणपत्र महाविद्यालयस्तरावर पदवी वितरण समारंभ आयोजित करण्यात येऊन वितरीत करण्यात येतात. या शैक्षणिक वर्षाच्या स्नातकांनी त्यांचे पदवी प्रमाणपत्र महाविद्यालयातून प्राप्त करवून घ्यावे.

२. महाविद्यालयास विद्यापीठाकडून पदवी प्रमाणपत्र प्राप्त झाले नसल्यास याची संपूर्ण खात्री करुन महाविद्यालयांनी संबंधित विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचे पत्र व यादीची प्रत विद्यार्थ्यास द्यावी किंवा महाविद्यालयाचे प्रतिनिधी यांनी प्रत्यक्ष विद्यापीठात सादर करावी व ज्यांचे पदवी प्रमाणपत्र मिळालेले नाहीत, अशा विद्यार्थ्यांचे पदवी प्रमाणपत्रासाठी कार्यवाही करावी.

३. शैक्षणिक वर्ष २०१७ पूर्वीच्या स्नातकांनी प्रत्यक्ष परिपूर्ण आणि अचूक अर्ज सादर केल्यास, अशा स्नातकांना ते व्यक्तिशः उपस्थित असल्यासच पदवी प्रमाणपत्र (०७) दिवसांत वितरीत करण्यात येईल. त्यासाठी त्यांनी खालीलप्रमाणे ओळखीचा पुरावा जवळ बाळगणे आवश्यक आहे.
(१) आधारकार्ड, (२) पॅनकार्ड, (३) ड्रायव्हिंग लायसन्स (४) महाविद्यालयाचे ओळखपत्र

४. टपालाने प्राप्त आवेदपत्राचे पदवी प्रमाणपत्र शिघ्र टपालाने पाठविण्यात येतील.

५. कोणत्याही परिस्थितीत प्रत्यक्ष स्नातकाव्यतिरिक्त इतरांना पदवी प्रमाणपत्र वितरीत / हस्तगत करण्यात येणार नाही.

६. शैक्षणिक वर्ष २०१७ नंतरच्या उत्तीर्ण व पात्र स्नातकांनी पदवी प्रमाणपत्र महाविद्यालयातून प्राप्त करावे.

वरील सूचनांचे पालन स्नातक, महाविद्यालयांचे प्रतिनिधी, कर्मचारी यांनी करावे, अशी विनंती करण्यात येत आहे.

Bharti

संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ